**आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या दुप्पट करणे, सेवा केंद्रांवरुन देण्यात येणाऱ्या सेवांच्या दरात सुधारणा करणे व घरपोच सेवेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक- आसेकें-१७२५/प्र.क्र. ८६/मातं(३९)**
हूतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक :- २७ मार्च, २०२५

संदर्भ :- १) शासन निर्णय, सिओएम १००२/प्र.क्र.२४०/०२/३९, दि. २३ ऑगस्ट, २००२
२) शासन निर्णय, क्रमांक क्र. मातंसं/प्र.क्र. २८/३९, दिनांक ३ डिसेंबर, २००८
३) शासन निर्णय, क्रमांक मातंसं २०१२/प्र.क्र. १५२/३९, दिनांक २३ मे, २०१२
४) शासन निर्णय, क्रमांक मातंसं ०४७/१/२०१४/३९, दिनांक ५ सप्टेबर, २०१४
५) शासन निर्णय, क्रमांक मातंसं १७१६/प्र.क्र. ५१७/३९ दिनांक ५ डिसेंबर, २०१६
६) शासन निर्णय, क्रमांक मातंसं १७१६/प्र.क्र. ५१७/३९ दिनांक १९ जानेवारी, २०१८

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्याचे झपाट्याने डिजिटायझेशन होणे ही काळाची गरज आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना विविध शासकीय सेवा/लाभ मिळविण्यासाठी लागणारा श्रम,निधी व वेळ यांचा अपव्यय टाळता यावा व त्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विहित मुदतीत विविध विभागांच्या सुविधा मिळाव्यात यासाठी राज्यामध्ये आपले सरकार सेवा केंद्रांची स्थापना करण्यात आलेली आहे. लोकसंख्येच्या तुलनेत आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या कमी असल्याकारणाने सन २०११ ची जनगणना प्रमाण मानून संदर्भाधिन क्र. ६ येथील शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि. १९ जानेवारी, २०१८ मधील परिच्छेद क्र.१ अन्वये आपले सरकार सेवा केंद्र स्थापना करण्याचे निकष ठरविण्यात आले आहेत. सदर शासन निर्णय निर्गमित होऊन साडेसहा वर्षापेक्षाही जास्त कालावधी उलटून गेला आहे. दरम्यान दिवसेंदिवस लोकसंख्येमध्ये झालेली वाढ आणि त्यामुळे आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता विचारात घेता, संदर्भाधीन शासन निर्णय दि.१९ जानेवारी,२०१८ मधील परिच्छेद क्र. १ अन्वये ठरवून दिलेल्या आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन करण्याच्या निकषात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्याचप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्रांवरुन नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांचे दर शासन निर्णय दि. ०३.१२.२००८ अन्वये रु.२०/- ठरविण्यात आले होते. दिवसेंदिवस महागाईमध्ये झालेली वाढ आणि महाआयटी आणि आपले सरकार सेवा केंद्र चालक यांचेकडून सेवांचे दर वाढविणेबाबत करण्यात आलेली विनंती विचारात घेऊन सध्याच्या सेवा दरामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करणे आवश्यक झाले. तसेच, आपले सरकार सेवा केंद्रांतर्गत नागरीकांना त्यांच्या मागणीनुसार आपले सरकार पोर्टलवर प्रत्येक घरपोच सेवा पुरविणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यानुषंगाने मा.मंत्री, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य यांनी विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात निवेदनही केलेले आहे.

**शासन निर्णय:-**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/ प्र.क्र.५१७/३९, दिनांक १९ जानेवारी, २०१८ मधील परिच्छेद क्र.१ अन्वये ठरवून दिलेली लोकसंख्या आणि आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या याबाबतच्या निकषात खालीलप्रमाणे बदल करुन आपले सरकार सेवांची संख्या वाढविण्यात येत आहे.:-

अ) प्रत्येक ग्राम पंचायत क्षेत्रात २ आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन करण्यात येईल. मात्र, ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) असलेल्या ग्राम पंचायतीत किमान ४ केंद्रे स्थापन करण्यात येईल.

आ) शहरी भागांसाठी आपले सरकार सेवा केंद्रासाठी खालील निकष राहतील. (२०११ च्या जनगणनेनुसार):-

- बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र- २५००० लोकसंख्येसाठी २ केंद्र
- इतर महानगरपालिका व नगरपरिषद- १०००० लोकसंख्येसाठी २ केंद्र
- प्रत्येक नगर पंचायत क्षेत्रात किमान दोन आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन करण्यात येईल. मात्र, ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या नगर पंचायतीत किमान ४ केंद्रे स्थापन करण्यात येईल.
- वरील निकषात आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी बदल करण्यात येईल.

शहरी भागात स्थापन करावयाच्या "आपले सरकार सेवा केंद्रांची" संख्या महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायत इ. यांच्या प्रत्येक झोन/वार्ड (प्रशासकीय) मध्ये शक्यतो समप्रमाणात विभागण्यात यावी. सदर कार्यवाही अध्यक्ष, जिल्हा सेतू समिती/ (जिल्हा ई-गर्व्हनन्स सोसायटी (DeGS)) तथा जिल्हाधिकारी यांचेमार्फत, या शासन निर्णयाच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत करण्यात यावी. तसेच, वेळोवेळी शासनाच्या सुचनेनुसार या संख्येमध्ये आवश्यक तो बदल जिल्हाधिकारी यांच्या मार्फत करण्यात यावा.

२. **सेवा दरांच्या वाढीबाबत**

आपले सरकार सेवा केंद्रांवरुन नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांच्या सध्याच्या सेवा दरामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.:-

| सेवा शुल्क (अर्जाची फी) | राज्य सेतू केंद्रांचा वाटा | महाआयटीचा वाटा | जिल्हा सेतूसोसायटीचा वाटा | आपले सरकार सेवा केंद्र चालकाचा वाटा (VLE) |
|---|---|---|---|---|
| रु ५०/- | रु. २.५/- (५%) | रु.१०/- (२०%) | रु.५/- (१०%) | रु.३२.५०/- (६५%) |

**३. आपले सरकार सेवा केंद्र चालकाद्वारे नागरिकांना घरपोच वितरण:-**

आपले सरकार सेवा केंद्रांतर्गत नागरीकांना त्यांच्या मागणीनुसार आपले सरकार पोर्टलवर प्रत्येक घरपोच सेवेच्या नोंदणीसाठी रु.१००/- (कर वगळून) एवढे शुल्क निश्चित करण्यात येत आहे. सदर शुल्क आपले सरकार सेवा केंद्र चालकामार्फत नागरिकांकडून गोळा करण्यात येईल. *रु.१००/- (कर वगळून) दरामधील हिस्सेदारी पुढीलप्रमाणे राहिल:-

| अ.क्र. | | वाटा (एकूण दराच्या) | |
|---|---|---|---|
| १ | महाआयटीचा सेवा दर | २०% | प्रत्येक ऑनलाइन सेवा बुकिंगसाठी |
| २. | आपले सरकार सेवा केंद्रचालकासाठी सेवा दर | ८०% | घरपोच भेटीसाठी |

*वरील दराव्यतिरिक्त प्रती अर्ज फी रु.५०/-(सुधारीत दर) या प्रमाणे अर्जदाराकडून सेवाशुल्क घेण्यात येईल.

सदर शासन निर्णयातील तरतूदी या आदेशाच्या दिनांकापासून लागू राहतील सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०३२७१८२५५०८३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUDAM EKNATH ANDHALE

Digitally signed by SUDAM EKNATH ANDHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=257966df2620df1403d35023802519a4fbdcfcd894791eba41c2aef2b4c4b975, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7B57FEE59F0E7101B822A49C72629C21BF9B4DC0BDE136817EE19B6B347E77F4, cn=SUDAM EKNATH ANDHALE
Date: 2025.03.27 18:27:09 +05'30'

(सुदाम ए. आंधळे)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
५. सर्व अपर मुख्य सचिव/ सर्व प्रधान सचिव/विशेष सचिव/सचिव
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७. प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा), मुंबई,
८. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
९. प्रबंधक, लोक आयुक्त/उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१०. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
११. महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१२. महालेखापाल १/२ लेखा व परिक्षा महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१३. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
१४. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१५. सर्व महानगरपालिका आयुक्त
१६. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. सर्व उप मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषदा
१८. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख
२०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२३. निवड नस्ती (का.३९).